
Estd. 1962
'A' Re-accredited by NAAC (2014)
With CGPA 3.16

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ५१ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

गुरुवार, दि. २९ जानेवारी, २०१५



## मा. प्रा. (डॉ.) ना. ज. पवार

कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## यांनी सादर केलेला अहवाल

Estd. 1962

'A' Re-accredited by NAAC (2014)
with CGPA 3.16

# ५१ वा दीक्षान्त समारंभ

## प्रा. डॉ. एन्. जे. पवार,

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**यांनी सादर केलेला अहवाल**

शिवाजी विद्यापीठाचा ५१ वा दीक्षान्त समारंभ आज संपन्न होत आहे. या ऐतिहासिक समारंभाचे प्रमुख पाहुणे कोल्हापूरचे सुपुत्र पद्मभूषण, पद्मविभूषण व प्रख्यात खगोलशास्त्रज्ञ प्राध्यापक मा. डॉ.जयंत नारळीकर व ज्यांना या विद्यापीठाची डी.लिट.ही सन्माननीय पदवी प्रदान करण्यात येणार आहे ते पद्मश्री डॉ. डी.वाय.पाटील, या समारंभास आवर्जून उपस्थित असलेले श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, उपस्थित मान्यवर, आमदार, खासदार, महापौर, नगरसेवक, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिसभा, विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, नूतन पदवीधर, इतर विद्यार्थी/विद्यार्थीनी, माध्यमांचे प्रतिनिधी आणि मित्रहो, आजच्या या दीक्षान्त सोहळ्यासाठी मी आपले सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करतो.

सुरवातीलाच ५१ व्या दीक्षान्त समारंभात पदवी व पदविका प्राप्त करणाऱ्या सर्व स्नातकांना मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

शिवाजी विद्यापीठ हे छत्रपती शिवाजी महाराज या थोर महापुरुषांच्या नावाने सुरु झालेले विद्यापीठ आहे हे आपणास ज्ञातच आहे शिवाय या विद्यापीठाला राजर्षि छत्रपती शाहू महाराज, थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांच्या विचारांचा वारसा लाभला आहे. छत्रपती राजाराम

महाराज आणि डॉ.बाळकृष्ण यांचे कोल्हापूरात विद्यापीठ व्हावे असे स्वप्न होते. हे स्वप्न साकार करण्यासाठी कै. मा. यशवतंरावजी चव्हाण व लोकनेते बाळासो देसाई, बॅ.बाळासाहेब खर्डेकर, डॉ.सी.रा.तावडे आणि या परिसरातील अनेक मान्यवर यांनी प्रयत्न केले. विद्यापीठ स्थापनेनंतर प्रथम कुलगुरु मा. डॉ.आप्पासाहेब पवार यांनी या विद्यापीठाच्या उभारणीत अथक परिश्रम घेतले याचा मी येथे आवर्जून उल्लेख करतो.

हे विद्यापीठ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी स्थापन झाले असून सुवर्णमहोत्सवी वर्षापर्यंत या विद्यापीठाने वाटचाल केली आहे. या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने मी गौरवपूर्ण ऐतिहासिक घटनेचा निर्देश करतो. विद्यापीठ नुकतेच नॅक, बेंगलोर यांच्या परीक्षणास सामोरे गेले व आनंददायक बाब म्हणजे या विद्यापीठाने 'ए' मानांकन प्राप्त केले. त्याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे नॅकने दिलेला विद्यापीठाचा सी.जी.पी.ए. स्कोर हा ३.१६ इतका असून तो महाराष्ट्रातील अकृषी विद्यापीठांमध्ये सर्वोच्च आहे. या उज्ज्वल यशाचे मानकरी निश्चितच आपण सर्वजण आहात.

विद्यापीठास पर्यावरणविषयक दाखविलेली सजगता, विशेषत: पाण्याची स्वयंपूर्णत्व, घन व रासायनिक कचऱ्याचे नियोजन, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात प्राप्त झालेले २९ पेटंट, अग्रणी महाविद्यालये आणि कमकुवत महाविद्यालय योजना, अकौंटस् कोड, कमवा आणि शिका योजना, क्षमताबाधित विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी खास सुविधा, एसआरपीडी इ. बाबींचा नॅक अहवालामध्ये विशेष गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सातारा, आणि सांगली या तीन जिल्हयामध्ये विस्तारले असून संलग्नित महाविद्यालयांची संख्या २८० वर गेली आहे. शिवाय १३ संशोधन संस्था विद्यापीठाशी संलग्नित आहेत. विद्यापीठात ३९ पदव्यूत्तर अधिविभाग कार्यरत आहेत. तसेच महाविद्यालयांतूनसुध्दा पदवीबरोबर पदव्युत्तर विभागही सुरु आहेत सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांना आठ विविध विद्याशाखातून पदवी आणि पदव्युत्तर उच्च शिक्षण आणि संशोधन

स्तरावरील शिक्षण दिले जाते. याबरोबरच काम करुन शिकणारे, शिक्षणाच्या नियमित प्रवाहात काही कारणाने येऊ न शकणारे असे एकूण सुमारे ४५००० विद्यार्थी दूरशिक्षण माध्यमातून शिक्षण घेत आहेत. या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात सुमारे तीन लाख विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत. महत्वाचे म्हणजे विद्यापीठाप्रमाणेच परिक्षेत्रातील १६ महाविद्यालयांना नॅक चे 'ए' मानांकन प्राप्त झाले आहे आणि काही महाविद्यालयांना College with Potential for Excellence हा दर्जा मिळाला आहे. उच्च शिक्षणातील Gross Enrollment Ratio (GER) वाढला पाहिजे याबाबत केंद्र शासन आणि राज्य शासन आग्रही आहे आणि त्यादृष्टीने विद्यापीठाची वाटचाल सुरु आहे. विद्यापीठात देशातील थोर पुरुष, महान व्यक्ती, विचारवंत, संत यांच्या नावाने अनेक अध्यासने सुरु आहेत.

मला पाहुण्यांना सांगण्यास आनंद होतो की, विद्यापीठाने नॅनोटेक्नॉलॉजी या प्रगत शास्त्रशाखेतील युजी/पीजी इंटिग्रेटेड प्रोग्रॅम गेल्या दोन वर्षामध्ये सुरु केलेला आहे. या विभागाच्या स्वतंत्र इमारतीचे बांधकाम वेगाने सुरु आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होत असलेल्या अनुदानातून यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट कार्यरत झाले आहे आणि त्याअंतर्गत Master of Rural Studies, Master of Social Work, Master of Computer Applications असे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमही शिकविले जात आहेत.

विद्यापीठाच्या विकासासाठी, संशोधन कार्यात विविध अधिविभागातील प्राध्यापक सतत प्रयत्नशील असल्याने UGC, DBT, DST, ICSSR, RGST Mumbai, SERB, ICHR, SER, CSIR, MOEF, BRNS, DRDO, MST, MS & T या सर्व शिखर संस्थांकडून विद्यापीठास भरघोस निधी प्राप्त झाला आहे. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी या विभागास TEQIP या योजने अंतर्गत वर्ल्ड बॅंकेकडून १० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. तसेच विशेष आनंदाची बाब म्हणजे विद्यापीठातील १० विभागांना DST-FIST या योजने अंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे. DBT यांच्यामार्फत IPLS प्रोग्रॅम मिळालेले आपले विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. विद्यापीठात विविध उपक्रमांचे

संशोधन मोठया प्रमाणावर सुरु असून त्यामध्ये १० विभागांना UGC-SAP अंतर्गत अनुदान प्राप्त झाले आहे, शिवाय आठ विभागांमध्ये DST-PURSE प्रोग्रॅम सुरु आहेत. हा प्रोग्रॅम राबविणाऱ्या देशातील ३० विद्यापीठांमधील चार उत्तम विद्यापीठांमध्ये आपल्या विद्यापीठाचा समावेश आहे. तसेच DST-SAIF हाही प्रोग्रॅम सुरु आहे. या विविध योजनेअंतर्गत या वर्षी सुमारे ४५ कोटी १७ लाख रुपये इतके भरघोस अनुदान विद्यापीठास प्राप्त झाले. आजवर प्राप्त झालेल्या अनुदानामध्ये हे उच्चांकी अनुदान आहे. राष्ट्रीय स्तरावरील संशोधन पातळीवर भारतातील विद्यापीठांचे जे मूल्यांकन झाले, त्यामध्ये आपल्या विद्यापीठाचा 'h' INDEX ४७ इतका असून त्यामुळे आपले मानांकन देशात २५ वे आहे. विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाने देशातील २० बीटी स्कूलमध्ये आठवे स्थान मिळविले आहे. विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने सौरउर्जेमध्ये भरीव संशोधन केले आहे आणि त्यामुळे देशातील सौरउर्जेमध्ये संशोधन करणाऱ्या विभागांमध्ये आपल्या या विभागाचा देशात तिसरा क्रमांक आहे आणि मटेरीयल सायन्समध्ये २० वा क्रमांक आहे. शैक्षणिक विचारांची देवाण-घेवाण आणि संशोधनाला गती देण्यासाठी विद्यापीठाने गतवर्षी तीन आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील नऊ परिषदांचे यशस्वी आयोजन केले आहे. विद्यापीठ अधिविभागांबरोबरच महाविद्यालयातून सुध्दा संशोधन वाढले पाहिजे यादृष्टीने महाविद्यालयातून तज्ज्ञ संशोधकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आणि त्याचा संशोधन वाढीत चांगला परिणाम दिसून येत आहे.

Science Citation Index (SCOPUS) मध्ये विद्यापीठाने १५०८ संशोधन लेख प्रसिध्द केले आहेत. संशोधन वाढीस लागण्यासाठी आणि संशोधनाचा दर्जा उंचावण्यासाठी विद्यापीठाने रशिया, जपान, द.कोरिया, ब्राझील, फ्रान्स थायलंड, इटली, नायजेरीया, ऑस्ट्रेलिया अशा विविध प्रगत देशातील नामवंत विद्यापीठांशी सामंजस्य करार केले आहेत. विद्यापीठाची ही संशोधनातील कामगिरी पहाता मी असे खात्रीने म्हणू शकतो की, आमचे विद्यापीठ आता जागतिक स्तरावर पोहोचले आहे.

विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील नागरिकांपर्यंत प्रबोधनपर चांगले विचार पोहचले पाहिजेत म्हणून विद्यापीठ अनेक व्याख्यानमाला आयोजित करते. काही व्याख्यानमाला महाविद्यालयांमार्फतही आयोजित केल्या जातात त्यांचा लाभ समाजातील सर्व स्तरावरील लोकांना होत आहे.

विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, संशोधक विद्यार्थी या सर्वांना उत्तम सोयी-सुविधा देण्याचा आमचा सदैव प्रयत्न असतो. त्यादृष्टीने अनेक प्रकारच्या भौतिक सुविधा या काही वर्षात विद्यापीठाने उपलब्ध करुन दिल्या आहेत. यामध्ये अद्यावत असे डाटा सेंटर, ग्रंथालयाच्या इमारतीचे विस्तारीकरण, परीक्षा विभागाच्या ॲनेक्स इमारतीचे विस्तारीकरण आणि बी.टेक. इमारतीचे विस्तारीकरण या सर्व कामासाठी आजवर रुपये १२ कोटी खर्च झाले आहेत. विशेष आनंदाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटीक ट्रॅकचे उद्‌घाटन करण्यात आले. या सिंथेटीक ट्रॅकसाठी महाराष्ट्र शासनाने १.९१ कोटी रुपये मंजूर केले असून त्यापैकी १.१७ कोटी विद्यापीठास प्राप्त झाले आहेत. युजीसीने १.२१ कोटी रुपयांचे अनुदान दिले असून विद्यापीठाने स्वतःच्या फंडातून २.२८ कोटी उभे करुन हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण केला आहे. आपले खेळाडू विद्यार्थी विविध खेळामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहेत. याशिवाय विद्यापीठ परिसरामध्ये लीड बोटॅनीकल गार्डन कार्यरत असून विद्यापीठाच्या पन्हाळा येथील जागेवर स्पेस सायन्स सेंटरची उभारणी करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांची संशोधकीय गुणवत्ता वाढण्यासाठी विद्यापीठाच्यावतीने प्रत्येक वर्षी प्रत्येक विभागासाठी सुवर्ण महोत्सवी संशोधन शिष्यवृत्ती दिली जाते.

आपले विद्यापीठ हे विशिष्ट हेतूने सुरु झालेले विद्यापीठ असून बहुजन समाजातून, खेडयापाडयातून आलेले गरजू विद्यार्थी माफक शुल्कामध्ये उत्तम शिक्षण घेवून बाहेर पडले पाहिजेत याबद्‌दल आम्ही आग्रही आहोत. या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सुसज्ज वसतिगृहे,

'कमवा व शिका योजना', 'गरजेनुसार काम' या योजना त्यामध्ये करमणूक आणि इंटरनेट यांच्या सुविधा, अभ्यासासाठी ग्रंथालयामधून उत्तम दर्जाचे ग्रंथ आणि ई-जर्नल्स, तसेच विद्यार्थी सुविधा केंद्र ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे एका दिवसात मिळावीत अशा सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत.

कला, क्रीडा आणि सांस्कृतिक या क्षेत्रातील प्रगतीबरोबरच विद्यापीठाने आपली सामाजिक जबाबदारीही सातत्याने बजावलेली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून दुष्काळी भागात जलसंधारण कामकाज, महाराष्ट्र शासनाच्या 'निर्मल ग्राम' योजनेतील कामगिरी असे विविध समाजपयोगी उपक्रम विद्यापीठाने यशस्वीरित्या राबविले आहेत. याबरोबरच विद्यार्थीनींना सक्षम आणि निर्भिड बनविण्यासाठी निर्भया अभियान राबविले आहे. एनएसएस बरोबरच विविध महाविद्यालयात एनसीसीमध्येसुध्दा विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी बजावली आहे.

गेल्या काही वर्षामध्ये विद्यापीठाने ICT Based Governance साठी मोहिम घेतली आहे. तत्पर, पारदर्शी आणि जबाबदार प्रशासन करण्यासाठी ICT चा मोठया प्रमाणात प्रशासनात वापर झाला पाहिजे ही भूमिका घेऊन सर्व प्रशासकीय विभागामार्फत कामकाज सुरु आहे. त्यामध्ये वित्त विभागाच्या संपूर्ण कामकाजाचे यशस्वीरित्या संगणकीकरण आणि संगणक प्रणालीद्वारे कारभार सुरु आहे.

परीक्षा विभागाने विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून, परीक्षा फॉर्म भरण्यापासून निकाल लागेपर्यंत आणि निकालानंतरचे पुनर्मूल्यांकन या सर्व कामात ICT चा वापर सुरु केला आहे. विद्यापीठाने परीक्षेचे निकाल वेळेत जाहीर करण्याची परंपरा कायम राखली आहे. त्यासाठी मा.राज्यपाल यांनी कौतुक केले आहे आणि महाराष्ट्र शासनाने अन्य विद्यापीठांनाही शिवाजी विद्यापीठाकडून मार्गदर्शन घ्यावे असे कळविले आहे. राज्य शासनाच्या अग्रवाल समितीच्या परीक्षा सुधार योजनेतील संगणकीकृत माध्यमातून प्रश्नपत्रिका गोपनीयरित्या पाठविण्याचे

कामकाज यशस्वीरित्या सुरु आहे. विद्यापीठ स्थापनेपासून परीक्षा संबंधी सर्व कागदपत्रांचे डिजीटायझेशन करण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण झाला आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांना आता तत्परतेने सेवा देणे शक्य होणार आहे.

ऑक्टोबर, २०१४ च्या परीक्षेच्या अभियांत्रिकी विद्याशाखेच्या परीक्षेचा निकाल विक्रमी वेळेमध्ये म्हणजे परीक्षेनंतर १६ दिवसात जाहीर करण्यात आला. याकरीता विद्यापीठाने उत्तरपत्रिका तपासणी केंद्रांचे वर्गीकरण करणे आणि त्या केंद्रांवरुन विद्यापीठाच्या वेब पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने गुण भरण्याची संगणकीय कार्यप्रणाली अवलंबली आहे. विविध परीक्षांच्या ओरल, टर्म वर्क व प्रॅक्टिकलच्या परीक्षांचे पूर्णतः संगणकीकरण करण्यात आले असून त्यांचे अंतिम गुण विद्यापीठाच्या वेब पोर्टलवर सादर करण्याची सुविधा करण्यात आली आहे. पुढे येणाऱ्या सर्व परीक्षांकरीता गोपनीयतेच्यादृष्टीने महाविद्यालयांना सुरक्षित गठ्ठयांच्या स्वरुपात गोपनीय मुद्रणालयाकडून थेट प्रश्नपत्रिका पुरविल्या जाणार आहेत. सर्व परीक्षांकरीता बार-कोडेड उत्तरपत्रिकांची पध्दती अवलंबण्यात येणार आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या मानकानुसार सर्व गुणपत्रिकांवर विद्यार्थ्यांचे छायाचित्र छापण्यात येणार असून त्यामुळे गुणपत्रिकेची सुरक्षितता अबाधित रहाणार आहे. विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना Choice Based Credit System पध्दती अंमलात आणली आहे.

बीसीयुडी विभागाच्या बीयुटीआर विभागाकडून एम.फिल. व पीएच.डी. प्रवेश परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली आहे. पीएच.डी. मार्गदर्शकांची संपूर्ण माहिती ऑनलाईन उपलब्ध आहे. सर्व प्रकारचे महाविद्यालयीन स्तरावरचे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याशी निगडित माहिती तात्काळ उपलब्ध होण्याच्यादृष्टीने संगणकीय प्रणाली वापरण्यास स्वतंत्र प्रयत्न सुरु आहेत. संलग्नता विभागामध्ये लीड कॉलेज ही अभिनव योजना कार्यरत

असून त्याद्वारे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यासाठी विविध उपक्रम घेतले जातात. नियमित शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी विशिष्ट कौशल्ये आत्मसात करण्याबरोबरच त्यांना रोजगार मिळण्याच्यादृष्टीने काही Online Skill Based Courses सुरु करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

विद्यार्थी अलिकडे स्पर्धा परीक्षांकडे वळत आहेत हे लक्षात घेऊन विद्यापीठात अशा विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन केंद्र कार्यरत आहे आणि त्यातून यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही लक्षणीय आहे. या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिके, पुस्तके आणि अभ्यासिका या सोयीही उपलब्ध करुन दिल्या आहेत. विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटच्या माध्यमातून एमपीएससीच्या परीक्षेत अनेक विद्यार्थी अधिकारी आणि प्रशासकीय सेवेत निवडले गेले आहेत. तसेच स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण देण्यासाठी बार्टी, पुणे या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला आहे.

विद्यापीठाच्या विविध अधिविभागामधून ICT Based Teaching Learning चा वापर सुरु झाला आहे. मुडलच्या (MOODLE) माध्यमातून काही उपयुक्त कोर्सेस ऑनलाईन लर्निंग मोडमधून राबविले जात आहेत. आपल्या संलग्नित महाविद्यालयांपैकी १६८ महाविद्यालये नॅशनल नॉलेज नेटवर्कमधून जोडलेली आहेत. ज्याद्वारे देशविदेशातील तज्ज्ञांच्या उपयुक्त विषयावरील व्याख्यानांचा लाभ विद्यार्थी आणि शिक्षक घेत आहेत. विद्यापीठ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची दीर्घकाळ रिक्त असलेल्या पदांची भरती मोहिम यशस्वीपणे राबविण्यात आली आहे आणि त्यामुळे प्रशासनाला गती आली आहे.

विद्यापीठामध्ये मध्यवर्ती प्लेसमेंट सेल कार्यरत असून विविध कंपन्यांना कॅम्पस मुलाखतीसाठी बोलावून सुमारे १६०० विद्यार्थ्यांना नोकऱ्या उपलब्ध करुन देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

विद्यापीठाच्या क्रीडा विभागाची कामगिरी नेत्रदिपक आहे. पंजाब विद्यापीठ, चंदीगड येथे झालेल्या आर्चरी स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थी/विद्यार्थिनींनी विविध गटात नेत्रदिपक यश मिळविले आहे. त्याचबरोबर अण्णा विद्यापीठ, चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेट लिफ्टिंग व पॉवर लिफ्टिंग स्पर्धेमध्येही चांगले यश मिळविले आहे. कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र येथे झालेल्या पारंपारिक स्पर्धा म्हणजे रोप मल्लखांब, कब्बडी या स्पर्धामधून रौप्यपदक मिळविले आहे. तसेच गुजरात विद्यापीठ, गुजरात येथील स्पर्धेत विद्यापीठाच्या खो-खो महिला संघाने तर महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी येथे बुध्दिबळ (पुरुष) संघाने तृतीय क्रमांक संपादन केला आहे.

तीनही जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी तसेच त्यांना प्रशिक्षीत करण्यासाठी विद्यापीठाने 'छात्रसंसद' हा नावीन्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागामार्फत सालाबादप्रमाणे याही वर्षी ३२ वा युवा महोत्सव २०१४-१५ चे आयोजन द्विस्तरीय पध्दतीने करण्यात आले. जिल्हास्तरावर प्रथम एकांकिका, लोकनृत्य, समूहगीत, मूकनाटय, प्रहसनिका (लघुनाटिका), प्रश्नमंजुषा, वादविवाद व पथनाटय या सांघिक स्पर्धा व वक्तृत्व या वैयक्तिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. बारावा महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ सांस्कृतिक 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सव २०१४-१५ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे संपन्न झाला. या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या ४० सदस्यीय संघाने विविध स्पर्धामध्ये सहभागी होवून नेत्रदिपक यश संपादन केले. तसेच विद्यार्थी मंडळाचे नेतृत्व विकास 'शिलेदार' शिबीर २०१४ बहाई अकादमी, पाचगणी येथे यशस्वीरित्या पार पडले.

विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमार्फतही विविध उपक्रम संपन्न झाले. त्यामध्ये प्रामुख्याने पुणे ते पंढरपूर हरित ऊर्जा दिंडी, राष्ट्रीय व राज्यस्तरीय साहसी शिबीर, 'आव्हान' २०१४ राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर, राज्यस्तरीय गिर्यारोहण शिबीर, नवी दिल्ली येथे राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबीर व शिवाजी विद्यापीठ

संलग्न राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयांद्वारे दत्तक खेडयांमध्ये घेण्यात आलेल्या निवासी शिबीरांचा उल्लेख करता येईल.

आपल्या विद्यापीठातील विद्यार्थी सध्याच्या बदलत्या स्पर्धेला चांगल्या पध्दतीने तोंड देण्यासाठी तयार व्हावा. यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्देशित केल्याप्रमाणे अनेक महाविद्यालयांमध्ये युवक कल्याण कक्षाची स्थापना करुन वेगवेगळ्या कौशल्य विकासाचे उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये ३७०० हून अधिक युवकांनी प्रशिक्षणाचा फायदा घेऊन रोजगारक्षम युवाजागर अभियाना अंतर्गत केंद्र शासनाचा राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम यशस्वीरित्या राबविला.

विद्यापीठाचा सर्वांगीण प्रगतीचा हा अहवाल सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. मी येथे आवर्जून नमूद करतो की, विद्यापीठाच्या या सर्वांगीण प्रगतीमध्ये माझे सर्व अधिकार मंडळातील सहकारी, विद्यापीठ अधिविभाग प्रमुख, महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, समस्त शिक्षक बंधु-भगिनी, विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील प्रशासकीय सेवक या सर्वांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्याबरोबरच माझे धडपडणारे तरुण विद्यार्थी आणि त्यांचा सर्व उपक्रमातील सहभाग आणि प्रशासनास त्यांचे होत असलेले सहकार्य हे फारच मोलाचे आहे. त्याबरोबरच महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, केंद्र शासनाच्या सर्व फंडिंग एजन्सीज, समाजातील सर्व दानशूर व्यक्ती, वेळोवेळी सहकार्य करणारे उद्योजक आणि विद्यापीठावर प्रेम करणारे तीनही जिल्हयातील सर्वजण या सर्वांचे हे श्रेय आहे.

या वर्षाच्या सुरुवातीस म्हणजे १ जानेवारी, २०१५ रोजी असेच एक रॉल्फ नेवेलीना पुरस्कार जो पुरस्कार नोबेल पारितोषिकाच्या बरोबरीचा मानला जातो तो शास्त्रज्ञ डॉ.सुभाष खोत यांना प्राप्त झाला. डॉ.सुभाष खोत यांनाही विद्यापीठात नुकतेच आमंत्रित करण्यात आले होते.

आज विशेष योगायोगाची गोष्ट म्हणजे आपल्यामधीलच या संपूर्ण परिसराशी नाते असलेले कोल्हापूरचे सूपुत्र आणि आपल्या कार्यकर्तृत्वावर पद्मभूषण, पद्मविभूषण हा सन्मान प्राप्त करणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ व मराठी विज्ञान साहित्याचे निर्माते व प्रवर्तक प्राध्यापक डॉ.जयंत नारळीकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित आहेत. त्यांचा परिचय करुन देणे मी उचित समजतो.

डॉ.जयंत नारळीकर एक जगद्विख्यात शास्त्रज्ञ तर आहेतच पण ते एक उत्तम साहित्यिकही आहेत. खगोल शास्त्रात महान संशोधन करण्याबरोबरच त्यांनी मराठी-हिंदी साहित्यात विज्ञान साहित्याची मोलाची भर टाकली आहे. डॉ.नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणशी येथे झाले. तेथूनच सन १९५७ साली त्यांनी विज्ञानाची पदवी प्राप्त केली. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रीज विद्यापीठात गेले. तेथे त्यांनी बी.ए., एम.ए. आणि सुप्रसिध्द शास्त्रज्ञ सर फ्रेड हॉईल यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्या काळात त्यांना रॅंग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल व इतर अनेक बक्षिसे मिळाली. गुरुत्वाकर्षणावर त्या दोघांनी मिळून संशोधन करुन जो सिध्दांत मांडला तो 'हॉईल-नारळीकर सिध्दांत' या नावाने खगोलशास्त्रात प्रसिध्द आहे.

त्यांच्या महान कार्याची दखल अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली. त्यामुळे त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाले. १९६५ साली वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी त्यांना पद्मभूषण तर २००४ साली पद्मविभूषणने सन्मानित करण्यात आले. शिवाय डॉ.भटनागर स्मृती पारितोषिक, एम.पी.बिरला सन्मान आणि फ्रेंच ॲस्ट्रॉलॉजिकल सोसायटीचा पिक्स ज्यल्स जेन्सनसारखे सन्मानही त्यांना प्राप्त झाले. इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमीच्या इंदिरा गांधी पारितोषिकानेही त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. वैज्ञानिक विषयावर साहित्य निर्मिती करुन विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी त्यांना १९९६ साली युनेस्कोने कलिंग पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला आहे. आजही पुण्यातील

'आयुका'च्या माध्यमाने ते संशोधन कार्यात व्यस्त आहेत. आज चार दशकांहून अधिक कालावधीपासून त्यांचे अंतरिक्ष विज्ञान क्षेत्रात संशोधन सुरु आहे.

याबरोबरच कोल्हापूरचे दुसरे सन्माननीय सुपूत्र डॉ.ज्ञानदेव यशवंत पाटील यांना आज शिवाजी विद्यापीठाची सन्माननीय डी.लिट. ही पदवी प्रदान केली जात आहे. डॉ.पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्हयातील अंबप या गावी झाला. त्यांनी महाराष्ट्रात अनेक नामांकित शैक्षणिक संस्थांची पायाभरणी केली त्याचबरोबर देशात आणि परदेशातही शैक्षणिक संस्थांचा विस्तार केला. तसेच त्रिपुरा आणि बिहार या राज्यांचे राज्यपाल म्हणून त्यांनी यशस्वी कारकिर्द पार पाडली आहे.

मित्रांनो, आपण सर्वजण पदवीधर, पदव्युत्तर आणि संशोधनातील पदवी घेऊन एका नव्या जगात, नव्या युगात प्रवेश करणार आहात. हे नवे जग वेगवान जग आहे आणि स्पर्धेचे जग आहे आणि आता ही स्पर्धा जागतिक स्तरावरची स्पर्धा आहे त्यासाठी तुम्हाला या पदवीबरोबरच काही महत्त्वाची जीवनकौशल्ये आणि तंत्रकौशल्ये आत्मसात करावी लागणार आहेत. ज्यामुळे तुमच्या पुढील जीवनाचा कार्यकाल सुखद आणि आशादायी होणार आहे. जगातील जवळ जवळ सर्व देशात आपल्या विद्यापीठातील पदवीधर प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. त्यामध्ये तुम्ही नक्कीच मोलाची भर घालणार आहात याची मला खात्री आहे. तुमच्या पुढे असलेल्या आव्हानांना तुम्ही समर्थपणे सामोरे जाणार आहात याचा मला विश्वास वाटतो. तुम्हास पुढील वाटचालीस मी या प्रसंगी शुभेच्छा देतो !

!! जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

प्रकाशक : कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६ ००४

मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर-४१६ ००४